नियमीत दिवाणी दावा क्र.१८/२०१६

(दादु विरुध्द शोकत)

**<u>निशाणी क्र.६१, ६३ आणि ६५ खालील आदेश</u>**

**(दिनांक २५.०३.२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१अ ते १क यांनी त्यांचे विरोधात नि.क्र.४९, ५१ व ५३ वरील अर्जावर त्यांच्याविरोधात झालेला एकतर्फाचा आदेश दुर सारणेकरिता दाखल केला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादीविरुध्द अतिक्रमित जमीनीचा कब्जा मिळणेकरिता दावा दाखल केला असून वादी याने प्रतिवादी मयत झाल्याने नि.क्र.४९, ५१ व ५३ वर मयत प्रतिवादीचे वारस अबेटमेंटचा आदेश दुर सारुन विलंब माफ होवून वारस पटलावर समाविष्ट करण्याकरिता सादर केला होता व सदरच्या अर्जावर प्रस्तुत अर्जदारनी त्यांचे म्हणणे सादर न केल्याने दि.०३.०४.२०२३ रोजी एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला. अर्जदार हे अशिक्षित असल्याने त्यांनी विहीत मुदतीत त्यांचे म्हणणे सादर केले नाही त्यामुळे प्रस्तुतचे अर्ज मंजूर केल्यास व त्यांना म्हणणे सादर करण्याची संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. करिता प्रस्तुतचे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे सादर केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जातील कारणे संयुक्तिक नसल्याने अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. वादी व अर्जदार यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाचे, दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरोधात अतिक्रमीत जमीनीचा कब्जा मिळणेकरिता दाखल केला आहे. अर्जदारने नि.क्र.४९, ५१ व ५३ वरील अर्जावर त्यांचे म्हणणे सादर न केल्याने दि.०३.०४.२०२३ रोजी त्यांचे विरोधात

एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला. अर्जामधील कारणे संयुf क्तिक नसले तरी अर्जदारांना त्यांचे म्हणणे सादर करण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायाच्या तत्वाने आवश्यक आहे, अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरचे अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचित होईल. करिता मी खालीलप्रमाणे करीत आहे.

आदेश

१. अर्जदार यांचे निशाणी क्र.६१, ६३ व ६५ कडील अर्ज र.रु.५००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे व त्यांचेविरुध्द झालेला दि.०३.०४.२०२३ रोजीचा एकतर्फा आदेश दुर सारणेत येत आहे.

२. खर्चाची रक्कम वादी यांना देण्यात यावे.

३. दोन्ही पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

SHAIKH MOHAMMED AAMER
Digitally signed by SHAIKH MOHAMMED AAMER
Date: 2026.03.25 17:51:12 +0530

पलूस.
दिनांक– २५.०३.२०२६

(एम.ए.एम.जे. शेख)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पलूस.

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Sou.G.A. Patil (Grade-3) |
| Court | : | M.A.M.J. Shaikh, Civil Judge Junior Division & Judicial Magistrate First Class, Palus, Dist. Sangli. |
| Date | : | 25.03.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding officer on | : | 25.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 25.03.2026 |